महाराष्ट्र शासन

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर

सेक्टर२७, मिहान पुनर्वसन वसाहत खापरी, नागपूर- ४४११०८(महाराष्ट्र)

e-mail: principal.gcoenagpur@dtemaharashtra.gov.in • office.gcoenagpur@dtemaharashtra.gov.in

दुरध्वनी क्र. (०७१०३) २९५२२६(P), २९५२२०(O) •Website: www.gcoen.ac.in

**"To be an Institution of National Repute Creating Globally Competent Technocrats to Serve the Society"**

क्र.शाअमना/शिष्यवृत्ती/2023/ 6042

दिनांक : 05 DEC 2023

## महत्वाची सुचना – 7

**विषय : सन 2023-24 मध्ये तंत्रशिक्षण विभागांतर्गत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजना.**

**संदर्भ : 1. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. 18/तंशिसं/डीबीटी/विकाप/2023-24/243, दिनांक 20/10/2023.**

**2. मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर यांचे पत्र क्र. तंशिस/विकाना/डीबीटी/पोर्टल/शिष्य./2023-24/3364, दिनांक 15/10/2023.**

1) **<u>राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क योजना.</u>**

शैक्षणिक वर्ष 2023-2024 ला प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्ष तसेच नियमित व्दितीय, तृतीय, चतुर्थ वर्षात प्रवेशित विदयार्थी/विदयार्थीनीना सुचित करण्यात येते की, केंद्रीभूत प्रवेश प्रकियेव्दारे (CAP) पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिक मागासवर्गीयांना OPEN/SEBC/EWS/EBC प्रवर्गातील सर्व विदयार्थ्यांना सूचित करण्यात येते की, चालु शेक्षणिक वर्ष 2023-2024 करीता MAHADBT PORTAL वर नविन अर्ज भरणे तसेच अर्ज RENEWAL करणेबाबतची प्रक्रिया सुरू झालेली आहे.

➢ **योजनेचा लाभ : 50 % शिक्षण शुल्क आणि 50% परिक्षा शुल्क**

➢ **पात्रतेचे निकष : (शासन निर्णय जीआर दिनांक 7 ऑक्टोबर 2017, 1 मार्च 2018, 31 मार्च 2018, 11 जुलै 2019 नुसार)**

- अर्जदाराचे नागरिकत्व भारतीय असावे.
- उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी (डोमिसाईल) असावा.
- अर्जदार संस्थेचा बोनाफाईड विदयार्थी असावा आणि शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या व्यावसायिक आणि तांत्रिक अभ्यासक्रमासाठी पदवी प्रवेश घेतलेला असावा.
- उमेदवाराने केंद्रीभूत प्रवेश प्रकियेव्दारे (कॅप) प्रवेश घेतलेला असावा.
- अर्जदाराने इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ घेऊ नये.
- चालु शैक्षणिक वर्षासाठी कुटुंबातील फक्त 2 मुलांना या योजनेचा लाभ घेण्याची परवानगी आहे.
- कुटुंबाचे/पालकांचे एकुण वार्षिक उत्पन्न 8 लाखहुन अधिक नसावे.
- मागील सेमिस्टरमध्ये किमान 75% उपस्थिती आवश्यक आहे. (कॉलेजमध्ये नव्याने प्रवेश घेणारे यास उपवाद आहेत.)
- कोर्स कालावधी दरम्यान, उमेदवाराचा शैक्षणिक खंड कालावधी 2 किंवा 2 वर्षापेक्षा जास्त नसावे.
- ज्यांनी सर्वसाधारण प्रवर्ग आणि इ.बी.सी./इ.डब्ल्यु.एस. /एस.इ.बी.सी. प्रवर्गातुन प्रवेश घेतला आहे असे उमेदवार पात्र आहेत.



Scanned with OKEN Scanner

➤ **सदरील शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेण्याकरीता पात्र विदयार्थ्यांकडे खालील मुळ बाबी असणे आवश्यक आहे.**

- दहावी आणि त्यानंतरची मार्कशीट.
- महाराष्ट्र राज्याचा रहिवासी (डोमिसाईल) असल्याचे प्रमाणपत्र.
- कौटुंबिक वार्षिक उत्पन्न प्रमाणपत्र चालू वार्षिक वर्षाचे (2022-2023)
- CAP ID LETTER
- FEE RECEIPT
- चालू वर्षात कुटुंबातील 2 पेक्षा जास्त लाभार्थी नाही असे प्रतिज्ञापत्र.
- उपस्थितीचा पुरावा.
- आधारकार्ड मध्ये स्वत:चा ई-मेल आय.डी. व मोबाईल नंबर UPDATE असणे.
- इंडियन पोस्टल पेमेंट बँकेचे (IPPB) चे बचत खाते असणे.

2) **डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह योजना.**

शैक्षणिक वर्ष 2023-2024 ला प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्ष तसेच नियमित व्दितीय, तृतीय, चतुर्थ वर्षात प्रवेशित विदयार्थी/विदयार्थीनीना सुचित करण्यात येते की, केंद्रीभूत प्रवेश प्रकियेव्दारे (CAP) पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिक मागासवर्गीय OPEN/SEBC/EWS/EBC प्रवर्गातील ज्या विदयार्थ्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजूर आहेत असे सक्षम प्राधिकरणाव्दारे प्रमाणित केले आहे. अशा विदयार्थ्यांसाठी ही योजना आहे. चालु शैक्षणिक वर्ष 2023-2024 करीता MAHADBT PORTAL वर नविन अर्ज भरणे तसेच अर्ज RENEWAL करणेबाबतची प्रक्रिया सुरू झालेली आहे.

➤ **योजनेचा लाभ :**

- **नोंदणीकृत कामगार/अल्पभुधारक (मार्जिनल जमीन धारक) च्या मुलासाठी**
  - **A) एसएसआरडीए/पीएमआरडीए/नागपूर शहरातील संस्थांसाठी रु. 30000/- 10 महिण्यांसाठी.**
  - **B) इतर क्षेत्रातील संस्थेतील रु. 20000/- 10 महिण्यांसाठी.**

- **वार्षिक कौटुंबिक उत्पन्न 8 लाखांपर्यंत असलेल्यांकरीता.**
  - **A) एसएसआरडीए/पीएमआरडीए/नागपूर शहरातील संस्थांसाठी रु. 10000/- 10 महिण्यांसाठी.**
  - **B) इतर क्षेत्रातील संस्थेतील रु. 8000/- 10 महिण्यांसाठी.**

➤ **पात्रतेचे निकष : (शासन निर्णय जीआर दिनांक 7 ऑक्टोबर 2017, 1 मार्च 2018, 31 मार्च 2018, 11 जुलै 2019 नुसार)**

- अर्जदाराचे नागरिकत्व भारतीय असावे.
- उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी (डोमिसाईल) असावा.
- अर्जदार संस्थेचा बोनाफाईड विदयार्थी असावा आणि शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या व्यावसायिक आणि तांत्रिक अभ्यासक्रमासाठी पदवी प्रवेश घेतलेला असावा.
- उमेदवाराने केंद्रीभूत प्रवेश प्रकियेव्दारे (कॅप) प्रवेश घेतलेला असावा.
- अर्जदाराने इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ घेऊ नये.
- चालु शैक्षणिक वर्षासाठी कुटुंबातील फक्त 2 मुलांना या योजनेचा लाभ घेण्याची परवानगी आहे.
- कुटुंबाचे/पालकांचे एकुण वार्षिक उत्पन्न 8 लाखहुन अधिक नसावे.



Scanned with OKEN Scanner

- मागील सेमिस्टरमध्ये किमान 75% उपस्थिती आवश्यक आहे. (कॉलेजमध्ये नव्याने प्रवेश घेणारे यास उपवाद आहेत.)
- कोर्स कालावधी दरम्यान, उमेदवाराचा शैक्षणिक खंड कालावधी 2 किंवा 2 वर्षापेक्षा जास्त नसावे.
- ज्यांनी सर्वसाधारण प्रवर्ग आणि इ.बी.सी./इ.डब्ल्यु.एस. /एस.इ.बी.सी. प्रवर्गातुन प्रवेश घेतला आहे असे उमेदवार पात्र आहेत.

➢ **सदरील शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेण्याकरीता पात्र विदयार्थ्यांकडे खालील मुळ बाबी असणे आवश्यक आहे.**

- दहावी आणि त्यानंतरची मार्कशीट.
- महाराष्ट्र राज्याचा रहिवासी (डोमिसाईल) असल्याचे प्रमाणपत्र.
- कौटुंबिक वार्षिक उत्पन्न प्रमाणपत्र चालू वार्षिक वर्षाचे (2022-2023)
- CAP ID LETTER
- FEE RECEIPT
- चालू वर्षात कुटुंबातील 2 पेक्षा जास्त लाभार्थी नाही असे प्रतिज्ञापत्र.
- उपस्थितीचा पुरावा.
- आधारकार्ड मध्ये स्वत:चा ई-मेल आय.डी. व मोबाईल नंबर UPDATE असणे.
- इंडियन पोस्टल पेमेंट बँकेचे (IPPB) चे बचत खाते असणे.
- वसतीगृह पावती/भाडेतत्वावर राहत असल्यास करारनामा, घरमालकाचे आधारकार्ड व पॅनकार्ड.
- संस्थेचे हमीपत्र.

➢ **टिप :**

- उमेदवाराने महाराष्ट शासनाच्या वेबसाईट या महाडीबीटी पोर्टवर उपलब्ध असलेल्या वापरकर्ता पुस्तिकेचा वापर करावा. उमेदवार त्यातील सूचनांचे पालन करावे आणि अर्ज भरण्याच्या शेवटच्या तारखेपुर्वी ऑनलाईन अर्ज भरावा.
- वर दिलेली माहिती केवळ संदर्भाकरीता देण्यात आलेली आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत शिष्यवृत्ती योजनेच्या पात्रतेच्या निकष , आवश्यक आहे.
- शिष्यवृत्तीची रक्कम उमेदवाराच्या बँक खात्यात वितरीत होणेकरीता त्यांना आपला आधार नंबर बँक खात्याशी लिंक करणे आवश्यक आहे किंवा उमेदवाराचे इंडियन पोस्टल पेमेंट बँकेचे (IPPB) चे बचत खाते असणे आवश्यक आहे.

नोडल अधिकारी शिष्यवृत्ती,
शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय,
नागपुर

प्रबंधक,
शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय,
नागपुर

प्रत : 1) सर्व प्रवेशित विदयार्थी, शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय, नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता, देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या पालकांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

2) प्रोग्रामर, शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय, नागपूर यांना महाविदयालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्याकरीता.

3) विदयार्थी विभाग, सुचना फलक शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय, नागपूर.

4) सर्व विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदरची सुचना विभागाच्या सुचना फलकावर लावून तसेच विभागाच्या Whatsapp Group व्दारे आपल्या विभागातील विदयार्थ्यांना निदर्शनास आणून दयाव्यात.

Scanned with OKEN Scanner